# परिवहन आयुक्त महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय

# जाहीर सूचना

**कॅरेज बाय रोड ॲक्ट, २००७ व कॅरेज बाय रोड नियम, २०११ अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त करणेबाबत.**

कॅरेज बाय रोड अधिनियम, २००७ च्या अनुषंगाने केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांचे अधिसूचना क्र. जीएसआर-१७६ (ई) दि. २८.०२.२०११ नुसार कॅरेज बाय रोड नियम, २०११ प्रसिद्ध करण्यात आले असून, सदर नियम अधिसूचना प्रसिद्ध होण्याच्या दिनांकापासून लागू झाले आहेत. सदर नियम केंद्र शासनाच्या **www.morth.nic.in** या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

सदर नियमानुसार माल वाहतूक व्यवसायातील वाहतूकदार, ठेकेदार, बुकिंग एजंट, दलाल, वाहतूक कंपनी, कागदपत्रे/पाकिटे/मालाची घरपोहोच वाहतूक करणारी कुरिअर कंपनी तसेच मालाची साठवणूक करणारे, वितरक, माल जमा करणारे व्यावसायिक यांना कॉमन करिअर म्हणून क्षेत्रीय नोंदणी प्राधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेकडे अर्ज करून नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक आहे.

उपरोक्त सर्व संबंधितांना अवगत करण्यात येते की, संबंधित उप/प्रादेशिक परिवहन कार्यालयाशी संपर्क साधून सदर नोंदणी प्रमाणपत्र दि. ३१.०५.२०१८ पर्यंत प्राप्त करून घ्यावे अन्यथा मोटार वाहन अधिनियम तसेच नियमातील तरतुदींनुसार कारवाई करण्यात येईल.

**(सही)**
**अपर परिवहन आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

डीजीआयपीआर/२०१७-२०१८/7080

Scanned by CamScanner